निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शनिवार
२८ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १६ वे अंक: २२ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधांनी संपन्न महाराष्ट्र निर्माण करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई प्रतिनिधी**/ राज्यामध्ये प्राथमिक आरोग्य सुविधेपासून संदर्भीय सेवेपर्यंत आरोग्य व्यवस्था कार्यरत आहे. या व्यवस्थेला अधिक सक्षम, बळकट करण्यासाठी शासन आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून काम करीत आहे. जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा असलेला संपन्न महाराष्ट्र निर्माण करण्याचा मानस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करीत आरोग्य, औषध निर्माण क्षेत्रातील कंपन्यांनी शासनासोबत भागीदारी करण्याचे आवाहनही यावेळी केले.

जिओ वर्ल्ड सेंटर येथे पल्स् २०२६ वैद्यकीय परिषदेच्या निमित्ताने यूएस -इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या वतीने विविध औषध निर्माण, आरोग्य क्षेत्रातील कंपन्यांसोबत 'भारतासाठी भविष्य-सज्ज आरोग्यसेवा आणि कौशल्य विकास परिसंस्था' या विषयावर आयोजित राऊंड टेबल चर्चेप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

या चर्चासत्राला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ , वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगण, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे आदी उपस्थित होते.

चर्चासत्रदरम्यान विविध कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तरे दिली.

**औषध निर्माण क्षेत्रामध्येही ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, बऱ्याच क्षेत्रांमध्ये देशात महाराष्ट्राने ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटरची क्षमता निर्माण केली आहे. आता औषध निर्माण क्षेत्रामध्येही ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर निर्माण करण्यावर शासनाचा भर आहे. ताण तणाव आणि या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्य अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. मानसिक आरोग्याच्या उपचार सुविधा राज्यात निर्माण करण्यासाठी शासन काम करीत आहे.

**आरोग्य क्षेत्रामध्ये 'डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर'**

औषध निर्माण आरोग्य क्षेत्रात आवश्यक असलेले संशोधन आणि कुशल मनुष्यबळासाठी कौशल्य विकास, दर्जेदार वैद्यकीय शिक्षणावर भर देण्यात येत आहे. याकरिता कृत्रीम बुद्धिमत्तेच्या उपयोगाने प्लॅटफॉर्म तयार करण्यात येईल. आरोग्य क्षेत्रामध्ये 'डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर' उभारण्यात येत आहे. यासाठी राज्यात अनुकूल धोरण निर्मिती करण्यात येत आहे. भविष्यातील आजारांच्या संकटांवर यशस्वीपणे मात करण्यासाठी जीवशास्त्रामध्ये संशोधन वाढविणे आवश्यक आहे. या क्षेत्रात प्रोत्साहन देऊन नवनवीन विषयांबाबत पीएचडी स्वरूपात संशोधनाला चालना देण्यात येणार आहे,असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.





मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शासनाकडे आरोग्य, वैद्यकीय शिक्षण संबंधित मोठ्या प्रमाणावर डेटा आहे. या डेटाला कृत्रिम बुद्धिमत्तेशी संलग्नित करून आरोग्य क्षेत्राशी संबंधित विविध समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे शक्य होणार आहे. कर्करोगाचे लवकर निदान करण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येत असून उपचार सुविधांचा विस्तार करण्यात येत आहे. कर्करोगावर प्रभावी, कमी खर्चिक असलेल्या उपचार पद्धती निर्माण करणाऱ्या संशोधनासाठी राज्य शासन निश्चितच भरीव सहकार्य करेल.

**वैद्यकीय व आरोग्य क्षेत्रातील कंपन्यांसोबत भागीदारी**

डावोस येथे झालेल्या गुंतवणूक करारांमध्ये आरोग्य क्षेत्रातील गुंतवणुकीचाही समावेश आहे. यामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणा निश्चितच बळकट होणार आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. या तंत्रज्ञानाचा पुरेपूर उपयोग करून ' युनिफाईड लर्निंग प्लॅटफॉर्म' बनविण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे वेलनेस क्षेत्रात आपला ठसा उमटवीत आहे. मेडिकल टूरिझम राज्यात वाढत असून शासन गतीने पावले पुढे टाकत आहे. वैद्यकीय व आरोग्य क्षेत्रातील नवनवीन कल्पनांवर काम करण्यासाठी राज्य शासन या क्षेत्रातील कंपन्यांसोबत भागीदारी करण्यास तयार आहे असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

'डेंग्यू फ्री' राज्यासाठी या आजारावर संशोधित होत असलेल्या लसीचा उपयोग होणार आहे. औषध निर्माण, आरोग्य या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाकडून आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

राऊंड टेबल चर्चासत्राचे यूएस -इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा यांनी संचलन केले. उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी अन्बळगण यांनी उद्योग विषयक शासनाचे धोरण अधोरेखित केले. तसेच सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी मेडिसिटी, एज्युसिटी संदर्भात माहिती दिली. चर्चासत्रात जीएसके कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक भूषण अक्षीकर, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापक व अध्यक्ष नीरजा बिर्ला, दनेहार इंडिया कंपनीचे क्षेत्रीय अध्यक्ष संजय मुर्डेश्वर, जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पुष्कर कुलकर्णी, रेव्हिटी इंडिया लाईफ सायन्सेस आणि डायग्नोस्टिक्स कंपनीचे भारतातील अध्यक्ष श्रीपाद जोशी, आमदार तथा भारती विद्यापीठाचे उप कुलसचिव विश्वजीत कदम, टाकेडा इंडियाच्या कॉर्पोरेट अफेअर्सचे प्रमुख प्रभात सिन्हा, हिंदुजा समूहाचे पी. सी. सूद, अजिलास डायग्नोस्टिकचे अविनाश फडके, विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भारत अग्रवाल, एडवर्ड्स लाइफसाइंसेज संचालक ( गवर्नमेंट अफेयर्स ) डॉ. निरंजन पै, चैतन्य सरावते, सानोफी कंपनीच्या सीएसआर शाखेच्या उपसंचालक डॉ. कविता चौधरी आदींनी सहभाग घेतला.




# अंबड येथील शासकीय मुलींच्या वसतिगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण; तहसीलदारांकडे तक्रार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना जिल्हा प्रतिनिधी/ गणेश सपकाळ** / अंबड तालुक्यातील वलखेडा येथील मागासवर्गीय शासकीय मुलींच्या वसतिगृहात विद्यार्थिनींना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

या संदर्भात वसतिगृहातील एका मुलीने थेट तहसीलदारांकडे तक्रार केली असून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

मुलींच्या म्हणण्यानुसार, वसतिगृहात दिले जाणारे अन्न दर्जाहीन असून वेळेवरही योग्य प्रमाणात जेवण दिले जात नाही.

यामुळे विद्यार्थिनींच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचीही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अनेक वेळा तोंडी तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याचे विद्यार्थिनींचे म्हणणे आहे.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत तहसीलदारांकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे.संबंधित विभागाने याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच वसतिगृहातील मुलींना दर्जेदार व पौष्टिक आहार उपलब्ध करून द्यावा,अशी मागणी करण्यात येत आहे.

या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून समस्या सोडवावी, अशी अपेक्षा विद्यार्थिनी कडून व्यक्त केली जात आहे.





# इन्क्रेडिबल प्रीमियम लीग: १८ वर्षांचा जाज्वल्य प्रवास आणि १९ व्या हंगामाचा थरार!

जगातील सर्वात श्रीमंत आणि लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'इंडियन प्रीमियम लीग' (IPL) च्या १९ व्या हंगामाचा बिगुल आज, २८ मार्च रोजी वाजणार आहे. २००८ मध्ये सुरू झालेला हा प्रवास आज १८ वर्षे पूर्ण करून १९ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या अठरा वर्षांत क्रिकेटच्या मैदानावर अनेक विक्रम प्रस्थापित झाले, तर मैदानाबाहेर अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. मात्र, आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी न होता ती उत्तरोत्तर वाढतच गेली आहे.

**संकटांवर मात अन् यशाचे शिखर**

आयपीएलच्या प्रवासात अनेक अडथळे आले. 'मॅच फिक्सिंग' सारख्या किडीने या लीगला पोखरण्याचा प्रयत्न केला, ज्यामध्ये चेन्नई सुपर किंग्स आणि राजस्थान रॉयल्स यांसारख्या बलाढ्य संघांवर दोन वर्षांची बंदी घालण्यात आली. अनेक खेळाडूंना कायमचे घरी बसावे लागले. मात्र, बीसीसीआयच्या चोख नियोजनामुळे आयपीएलने या संकटातून फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेतली. अगदी कोरोनाच्या जागतिक संकटातही, जेव्हा जगातील इतर क्रीडा स्पर्धा ठप्प होत्या, तेव्हा बीसीसीआयने बायो-बबलमध्ये देशात आणि परदेशात यशस्वी आयोजन करून व्यवस्थापनाचा जागतिक आदर्श घालून दिला.

**नव्या संघांची एन्ट्री आणि बदललेली समीकरणे**

सुरुवातीला आठ संघांच्या या स्पर्धेत दोन वर्षांपूर्वी गुजरात टायटन्स आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन नव्या संघांची एन्ट्री झाली. गुजरात टायटन्सने तर पदार्पणातच विजेतेपद पटकावून आणि सलग दुसऱ्या वर्षी अंतिम फेरीत धडक मारून सर्वांना थक्क केले. आता १० संघांच्या या महाकुंभात स्पर्धेची रंगत अधिकच वाढली आहे.

**विजेतेपदाचा इतिहास आणि 'आरसीबी'चा दुष्काळ संपला**

आयपीएलच्या इतिहासावर नजर टाकल्यास मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांचेच वर्चस्व राहिले आहे.

या दोन्ही संघांनी प्रत्येकी ५ वेळा विजेतेपद पटकावले आहे. कोलकाता आणि हैदराबादने प्रत्येकी दोनदा, तर राजस्थान आणि गुजरातने एकदा बाजी मारली आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (RCB) ने अखेर विजेतेपदाचा दुष्काळ संपवून आपल्या चाहत्यांना मोठी भेट दिली. आता यंदा पंजाब, दिल्ली आणि लखनौ यांसारखे संघ नव्या उमेदीने मैदानात उतरतील.

**नेतृत्वाचे पालटलेले वारे: युवा पिढीच्या खांद्यावर धुरा**

यंदाचा हंगाम एका विशेष कारणासाठी चर्चेत आहे, ते म्हणजे अनेक संघांनी आपले कर्णधार बदलले आहेत.

रोहित शर्मा आणि एम.एस. धोनी: ज्यांनी आपल्या संघाला ५-५ वेळा विजेतेपद मिळवून दिले, ते यंदा केवळ खेळाडू म्हणून मैदानात दिसतील.

मुंबईने रोहितच्या जागी हार्दिक पांड्याकडे, तर धोनीने स्वतःहून पद सोडल्याने चेन्नईने ऋतुराज गायकवाडकडे नेतृत्व सोपवले आहे.

**नवे कर्णधार: * गुजरात टायटन्स: शुभमन गिल**
**कोलकाता नाईट रायडर्स: अजिंक्य रहाणे**
**पंजाब सुपर किंग्स: श्रेयस अय्यर**
**लखनौ सुपर जायंट्स: ऋषभ पंत**
**दिल्ली कॅपिटल्स: अक्षर पटेल**
**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू: रजत पाटीदार**
**सनरायझर्स हैदराबाद: ईशान किशन**
**राजस्थान रॉयल्स: रियान पराग**

**भारतीय क्रिकेटची 'नर्सरी'**

आज भारतीय संघात चमकणारे सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, यशस्वी जयस्वाल, रवींद्र जडेजा यांसारखे सर्वच तारे आयपीएलचीच देण आहेत. आयपीएल हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून भारतीय संघात प्रवेश करण्याचे ते मुख्य 'प्रवेश द्वार' ठरले आहे. या लीगमुळेच भारताला भविष्यातील नेतृत्व आणि दर्जेदार खेळाडू मिळत आहेत.

पुढील दोन महिने क्रिकेट प्रेमींसाठी ही एक मोठी मेजवानी ठरणार आहे.

प्रत्येक चेंडूगणिक बदलणारे समीकरण आणि युवा खेळाडूंचा जोश यामुळे यंदाची आयपीएल नक्कीच अविस्मरणीय ठरेल, यात शंका नाही.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने निवेदन दिले

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम/**
कन्नड शहरासह तालुक्यातील जनतेला घरपोच गॅस सिलिंडर देण्यात यावे, अशी मागणी यांन दिलेल्या निवेदनाद्वारे केली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने यांनी निवेदन दिले. आखाती युद्धामुळे कन्नड तालुक्यात गॅस तुटवडा निर्माण झाला आहे. त्यातच ऑनलाईन नोंदणी केल्याशिवाय गॅस मिळणार नाही असा नियम करण्यात आला आहे परंतू

आ ॅ न ला इ न नोंदणी यंत्रणाच बंद असल्याने नोंदणी होत नाही. नोंदणीसाठी शहरातील गंगासागर गॅस एजन्सी, बद्रीनाथ गॅस एजन्सीकडे जावे लागते. त्यानंतर सहा किलोमीटर अंतरावरील अंधानेर आणि ब्राम्हणी गराडा येथील गॅस गोदामावर जावे लागत आहे.या ठिकाणी जाण्यासाठी रिक्षावाले चारशे रूपये घेतात. तसेच त्याठिकाणी रांगा लागलेल्या असतात.

ऑनलाईन नोंदणी करणाऱ्यांना गोदामावर न बोलावता घरपोच गॅस सिलिंडर देण्यात यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. आज तालुक्यात गॅस टंचाई व गोरगरीब जनतेची परेशानी दूर व्हावी या निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख मा. अंबादास दादा दानवे यांच्या आदेशाने पुरवठा अधिकारी निलेश राठोड वैभव तोंडे विविध गॅस एजन्सी यांना




निवेदन सादर केले व त्यांना विनंती केली की घरपोच गॅस सिलेंडर देण्यात यावे दोन-चार दिवसात जास्त न मिळाल्यास नसता उद्धव शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल यावेळी तालुकाप्रमुख संजय मोटे शहर प्रमुख विश्वनाथ दादा त्रिभुवन शहर संघटक संतोष पवार सरपंच मोहिते पाटील उपस्थित होते यांची उपस्थिती होती.

# फुलंब्रीत रामकथा, ज्ञानयज्ञ सप्ताहाची सांगता

**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री प्रतिनिधी /**
फुलंब्री येथील श्रीराम मंदिर परिसरात रामनवमीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य संगीतमय रामकथा व ज्ञानयज्ञ सप्ताहाची सांगता गुरुवारी उत्साहात करण्यात आली.

नगराध्यक्ष तथा श्रीराम मंदिर संस्थानचे अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला.

राम मंदिरात १९ मार्चपासून ज्ञानयज्ञ सप्ताहास प्रारंभ झाला होता.

सप्ताहातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या रामकथेचे निरूपण प्रसिद्ध रामायण प्रवक्ते ह.भ.प. शिवानंद महाराज फुके यांनी केले. दररोज मोठ्या संख्येने भाविकांनी कथेचा लाभ घेत मंदिर परिसरात गर्दी केली होती.

रामनवमीच्या शुभमुहूर्तावर २६ मार्च रोजी कथेची सांगता करण्यात आली. यावेळी शिवानंद महाराज फुके यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनात त्यांनी रामजन्म सोहळा

आणि भक्तीचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

कीर्तनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा लाभ घेतला.

# स्व.विनोद कळंबे यांना शोकाकूल वातावरण मध्ये श्रद्धांजली अर्पण

# विनोद कळंबे यांचे सामाजिक योगदान खूप मोठे

**टेंभुर्णी प्रतिनिधी** / टेंभुर्णी येथील महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयात स्व.विनोद कळंबे यांना शोकाकुल वातावरणात भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आले.टेंभुर्णी येथील युगंधर प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकार संघाच्या वतीने व आपल्या शिक्षकी पेशातून तसेच अनेक सामाजिक संस्थाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी त्यांच्या सामाजिक काम त्यांनी केलेल्या समाज कामाची मोठे कार्य सर्वांसमोर ठेवण्यात आले.या माध्यमातून ऊस कामगार साठी त्यांच्या फडावर जाऊन त्यांच्या सोबत दिवाळी साजरी करणे हो,शिक्षक पतसंस्था च्या वतीने चेअरमन पदावर विराजमान झाल्यावर आपल्या शिक्षक प्रतिनिधी यांच्या मुलीच्या लग्नाची वेळी कन्यादान म्हणून त्यांना ११००० रु चे धनादेश देणे असेल, कोरोना काळात मरणाची भीती न बाळगता सर्वतोपरी मदत करणे शाळेसाठी आपल्या अनमोल योगदान पत्रकार म्हणून उत्तम लिखाण करून गरजूंना न्याय देणे असेल असे कित्येक कार्य त्यांचे आहे जे की आज त्यांच्या जाण्याने प्रामुख्याने पुढे आले.

या वेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अलकेश सोमाणी आदर्श शिक्षक सखाराम बोरकर सर डॉ रमेश मोठे ग्रामपंचायत सदस्य फैसल चाऊस सामाजिक कार्यकर्ता पी जी तांबेकर सर पवन झोरे,गोफणे सर,प्रा.दत्ता देशमुख, प्रदीप काबरा,प्रदीप मघाडे,शेख साबेर गुरुजी,नवभारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर सर,सावता तिडके गुरुजी,यांच्या सह मानव सेवा संघटनेच्या वतीने शेख नसीम सर यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली कार्यक्रमाची सूत्र संचलन महात्मा फुले वाचनालयाचे प्रमूख रावसाहेब अंभोरे यांनी केले.या वेळी डॉ अविनाश सुरुशे, सामाजिक कार्यकर्ता जनार्दन झोरे,रामू जंगले,अशोक पाबळे, भिका मामा धनंजय निकम, संतोष शिंदे उपसरपंच रहेमान शहा रमेश साळवे गजानन डोमळे संजय निकम डॉ हरणे पत्रकार शेख अशपाक भाऊसाहेब खांडेभराड,शैलीप्रकाश वाघमारे, बालाजी शेवाळे ,सुनील अभोरे पत्रकार सीताराम भाले,अर्जुन राऊत, दगडूबा तांबेकर गोविंद जाधव,पत्रकार सुनील



जोशी,फकरू कुरुशी सर,आशिष पैठणे,तय्यब चाऊस,भागाजी वाघमारे,अनिकेत अंभोरे आदी मान्यवर या वेळी श्रद्धांजली देण्यासाठी वेळ देऊन उपस्थित होते.

आपल्या जीवनातील त्यांच्या सोबतचे किस्से सांगता वेळी अनेकांनी दिली अश्रूंना वाट आम्हाला इतक्या लवकर सोडून जातील आणि त्यांना स्वर्गीय म्हणावी ही वेळ आमच्यावर आली हे खूप दुर्दैवी असल्याची भावना या वेळी सर्वांची बोलून दाखविली.

# कोणी भोंदूबाबा अब्रू लुटणार नाही.....

आज असे बरेच भोंदूबाबा आहेत की जे आज आपल्याला अंधश्रद्धेचे ढय दाखवून आपल्या इज्जती लुटतात. विशेष म्हणजे आपल्या इज्जती काही रस्त्यावर पडलेल्या नाहीत. तरीही भोंदूबाबा ते कृत्य करतात. परंतु यावर उपाय एकच. जो केल्यानं भोंदूबाबा आपल्यावर अत्याचार करणार नाहीत व आपली अब्रूही लुटणार नाहीत. ज्यातून आपली अब्रू सुरक्षीत असेल यात शंका नाही.*

काल अंधश्रद्धेनं लोकं वागत होते. कारण देशात विज्ञानानं प्रगती केली नव्हती. नवनवीन शोध लागले नव्हते. देशांतर्गत संबंध निर्माण झाले नव्हते व देश इतर पाश्चिमात्य देशाच्या संपर्कात आला नव्हता. परंतु आज तसं नाही. आज देशात नवनवीन शोध लागले आहेत. आजचा मानव चंद्रावर गेलेला आहे नव्हे तर तो अंतरीक्षातही गेलेला असून चंद्र आणि सुर्य काय? हेही त्याला माहीत झालेले आहे.

काल तसं नव्हतं. काल पृथ्वी सपाट आहे, असं मानणारा वर्ग होता. त्यातच पृथ्वी गोल आहे, असे म्हणणाऱ्या गॅलिलिओचथ विधान लोकांना पटलं नाही व त्याची लोकांनी हत्या केली. पुढं वास्को दि गामा जेव्हा आफ्रिकेच्या केपटाऊनला वळसा देवून भारतात आला. त्यातच मॅगेलाननं पृथ्वी प्रदक्षिणा घातली. तेव्हा कळलं की पृथ्वी गोल आहे. समजा ती सपाट असती तर आपण पडलोच असतो.

असा हा नवनवीन शोध लावण्याचा प्रकार. कालांतरानं समजायला लागलं की जगात वादळ, वारे, झाडं, पशूपक्षी, मानव हे कसे जन्मतात. कालांतरानं माहीत झालं की या पृथ्वीवर मांजर आडवी गेल्यास काहीही होत नाही. कालांतरानं माहीत झालं की कुत्रा भुंकल्यास अपशकुन होत नाही. कावळ्याच्या ओरडण्यानं पाहूणे येत नाही आणि घुबड दिवसा दिसण्यानंही कोणत्याच समस्या येत नाहीत. मग असे असतांना आजही काही लोकं अंधश्रद्धा मानतांना दिसतात. अंधश्रद्धा पाळतांना दिसतात. अंधश्रद्धेत गुरफटतांना दिसतात. त्यांना सर्वात मोठी शक्ती अंधश्रद्धेची वाटते. ते देव, दानव, भूत प्रेत सारंच काही मानतात. आपल्यावर वा आपल्या घरावर कोणी करनी केली आहे. असेही ते मानतात व भोंदू बाबांवर विश्वास ठेवून स्वतः च्या संसाराचा चुराडा करुन टाकतात. शिवाय या प्रकारावर केवळ अडाणी लोकंच विश्वास ठेवतात असे नाही तर चांगले उच्च शिकलेले लोकंही विश्वास ठेवत असतात. याबाबतीत अनेक लोकांनी लैख लिहिलेत. परंतु कोणी वाचले नसावेत. अनेक लोकांनी प्रवचनं दिली. ती कोणी ऐकली नसावीत. तसेच अनेक लोकांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करुन त्यावर प्रमाण दिलं. परंतु तेही लक्षात ठेवलं नसावंच. साधी रस्त्यावर गारुड्याचा खेळ दाखविणारी मंडळी, जी हातचलाखी करुन रुपये निर्माण करतात. ती मंडळी लोकांनी पैसे का मागतात? या साध्या गोष्टीवर लोकं विचार करुन ही हातचलाखी आहे. असा साधा विचार करीत नाहीत. अन् त्याच्या भीतीत गुरफटून जातात व आपल्या खिशातील पैसे त्याला काढून देतात. एवढे आपण मुर्ख आहोत. यात जो फसतो. त्याला मुर्खच म्हणावं लागेल की नाही?

भोंदू बाबा........ काय करतो भोंदू बाबा? तो त्याच्या बोलण्यानं आधी आपल्या मनाचा ताबा घेतो. म्हणतो की मी देव आहे. मला ब्रम्हांडाचं सगळं कळतं. तुम्ही अमुक करा, तमुक करा. तुमच्या घरात भुतबाधा लावली. अमुक तमुक लागला तुमच्या घरावर. तुम्ही अमुक अमुक करा. नाहीतर तुम्ही उध्वस्त होवून जाल.

तीच भीती. तो भोंदूबाबा घालून देतो. मग काय, आपल्याला एवढी भीती वाटते की आपण चक्क भोंदूबाबांच्या शब्दांच्या आहारी जातो. मग काय, तो जे जे बोलेल. ते ते सर्व करीत असतो आपण. ज्याचे पैसे जरी लागत नसले तरी भोंदूबाबा त्याचे लाखोच्या घरात पैसे उधळत असतो.

अशोक खरात. सेक्समध्ये कितीतरी महिलांना फसविणारा भोंदूबाबा. त्यानं नकली सापाच्या रुपानं लोकांना भीतीच दाखवली. खास करुन महिलांना. ज्यातून महिला त्याचेकडे आकर्षीत झाल्या. मग त्यानं डाव फेकला. विचार केला की लोकं अंधश्रद्धेला मानतात. जर या अंधश्रद्धेचा वापर करुन आपली कामवासना पुर्ण केली तर...... बस, विचारांचाच अवकाश. लागला तो ती कामवासना पुर्ण करायला. आता तो त्याच्याकडे येणाऱ्या महिला वर्गाला सांगू लागला की जर मुलं होत नसेल तर मी मुलंही करुन देतो. ज्यात महिला विश्वास ठेवायच्या. मग बाबा गे जे सांगेल. ते ते करायच्या. काही महिला त्याच्या कामवासनेला विरोध करीत असत. तेव्हा तो म्हणायचा की मी तुझा देव आहे. जर तू माझ्या इच्छेसमोर नकार देशील तर तुझा पती मरुन जाईल. तुझं बाळ मरुन जाईल. तुझा गर्भपात होईल. सगळं चालाकीनं सांगत होता भोंदूबाबा त्यांना आणि पुरेपूर अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या महिला त्याच्या त्या बोलण्यावर विश्वास ठेवायच्या. मग नकळतच त्याच्या कोणत्याही गोष्टीला विरोध न करता, इच्छा नसतांनाही सगळ्या गोष्टी नाईलाजास्तव करण्यासाठी सर्व महिला तयार व्हायच्या. एकीनंही त्याच्या दुष्कृत्यांना विरोध केला नाही. साधं चिंचोकं त्यानं लाख लाख रुपयाला विकलेलं आहे. अन् आपलं मुत्र सुद्धा महिलांना औषध म्हणून पाजलेलं आहे. शिवाय पैसा वेगळाच घेतलेला आहे. त्यातच आपली कामवासनाही त्यानं पुर्ण केलेली आहे. खरं तर तो माफिच्या लायक नाही. अशा व्यक्तीला भरचौकात बेदम मारण्याची गरज आहे की जेणेकरून दुसरा त्याच्याचसारखा भोंदूबाबा तयार होणार नाही.

भोंदूबाबा ऑआशिकचा. एखाद्या चित्रपटाला शोभेल, असं हे कथानक. परंतु ही वास्तविकता आहे. अशा वास्तविकता केवळ नाशिकातच नाही. तर इतर सर्वच ठिकाणी घडत असतात. एकदा असे दोन प्रसंग मी अनुभवले. एक अस्च बैरागी भीक मागत मागत आला. म्हटलं, 'जरा राव, पाणी पाजता काय?' मी त्याला पाणी दिलं. त्यानंतर त्यानं लगेच म्हटलं, 'सकाळपासून मी चहा घेतला नाही. जरा चहा पाजता काय?' मी त्याला चहा दिला. तसा चहा पिता पिता तो म्हणाला, 'आपल्या घरावर पंधरा दिवसात संकट येणार आहे.'

ते त्याचं बोलणं. त्यावर मी म्हटलं, 'ठीक आहे, संकट येणार आहे. परंतु यावर काही उपाय?'

त्यावर तो म्हणाला,

'माझ्याकडे एक जडीबुटी आहे. जी आसामला मिळते. चार हजाराची मिळते. जी आपल्या दरवाजात लावल्यानं संकट फक्त दरवाजापर्यंतच येईल व ही जडीबुटी पाहून निघून जाईल. जर तुम्हाला हवी असेल तर देतो. आपण चांगली माणसं दिसताय. चहा पाजला ओळख पारख नसतांना म्हणून देतोय. नाही तर मी कोणाला देत नाही. आपणाकडून फक्त हजार रुपये घेईल.'

ते त्याचं बोलणं. त्यावर त्याचा मला राग येत होता. परंतु तो राग मी आवळला व म्हटलं,

'बाबा, चहा पिवून झाला असेल तर लगेच उठा व निघायला लागा.'

ते माझं बोलणं. त्यावर तो म्हणाला,

'काय झालं बाळा?'

'काही नाही. तुम्ही निघाच लवकर.'

तो निघून गेला. त्यानंतर पंधरा दिवस का कितीतरी दिवसं झाले. संकट दिसलंच नाही. हं, सुखदुःखाचे प्रसंग नक्कीच येतात. संकटं येतही असतील. परंतु ते संकट म्हणजे काही मानव नाही की जो दरवाजावर बांधलेली जडीबुटी पाहिल व तेथूनच निघून जाईल. जर मी त्याचं ऐकलं असतं तर मला नक्कीच हजार रुपयाचा चुना लागला असता. दुसरा एक प्रसंग. ज्यावेळेस माझं वेतन काही कारणानं बंद होतं. तेव्हाही एक भोंदूबाबा आला. त्या भोंदूबाबाला जवळच्याच एका नातेवाईकानं आणलं होतं. तो म्हणाला, 'तुमच्या घराला नजर लागलेली आहे. नजर जोरदार आहे. तुम्ही अमुक अमुक नदीवर त्याबाबत पुजा करा. म्हणजे तुमच्यावर लागलेली नजर नक्कीच निघून जाईल व वेतन होईल.' आता वेतनाचा व नजरेचा कोणता संबंध. परंतु त्याची मजा घेत मी म्हणालो, 'किती रुपये लागणार या प्रक्रियेला?' त्यावर तो म्हणाला, 'सहा हजार.'

मी ठीक आहे म्हटलं. त्यानंतर मला त्याचे बरेच फोन आलेत. परंतु मी काही त्याचे फंदात पडलो नाही. शिवाय ठासून सांगीतलं की माझं वेतन नाही झालं तरी चालेल. परंतु मी त्याच्या फंदात पडणार नाही. पडलो असतो तर माझे सहा हजार रुपये गेले असते व वेतनही निघालं नसतं. मी फक्त एकच मार्ग स्विकारला, संविधानाचा. न्यायालयात गेलो व न्यायालयीन आदेशानुसार मला माझं वेतन मिळायला सुरुवात झाली. एवढंच नाही तर जुनं वेतनही मिळालं. शिवाय ज्या महिलेनं माझ्याकडे भोंदूबाबाला आणलं होतं. ती त्याला सात हजार रुपये महिना देत होती. कशासाठी देत होती? हे कळायला मार्ग नाही. परंतु ते नंतर कळलं.

भोंदूबाबा असेच असतात आणि ते आपल्या मनावर राज्य करतात. ते आपल्याला भीती दाखवतात. अमुक तमुक होईल. तसं नाही केलं तर...... मग आपण घाबरतो व त्यानं जे जे मागीतलं, ते ते सर्व देत असतोच. महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे की भोंदूबाबा हा अज्ञानी असतो. परंतु तो आपल्यासारख्या सुशिक्षीत लोकांच्या मनावर राज्य करतो आणि आपण सुशिक्षित असूनही स्वतःच्या मनानं विचार न करता फसतो.

कारण आपण संविधानावर विश्वास करीत नाही. स्वतः इतके संकटाला घाबरतो की बस. आपली बोबडीच वळते. मग तेच पाहात असलेला भोंदूबाबा त्याचा फायदा घेतो. आपणही विचार न करता भुत प्रेत करणीवर विश्वास करुन भोंदूबाबानं सांगीतलेल्या युक्त्यांवर प्रयोग करीत असतो. ज्यातून आपलं मानसिकच नाही तर शारीरिक आणि आर्थिकही नुकसान होत असते.

विशेष सांगायचं झाल्यास अज्ञानी लोकांचं ठीक आहे. त्यांना तेवढं कळत नसल्यानं ते भोंदूबाबांच्या आहारी जातात. परंतु आपण सुरक्षित आहोत ना. स्वतःला सुशिक्षित समजतो ना. मग असल्या अंधश्रद्धेच्या का आहारी जावं? का भीती बाळगावी अशा अंधश्रद्धेची की ज्यातून आपल्याला भोंदूबाबाचं मुत्र प्राशन करावं लागेल. एवढंच नाही तर त्याच्या कामवासनेचे शिकार बनावे लागेल? यानंतर आपण अशा कोणत्याच भोंदूबाबाच्या चक्करमध्ये पडू नये. तशी शपथ आपण घ्यावी. जेणेकरुन आपल्याला खोणी फसवणार नाही. आपली इजाजत कुणी लुटणार नाही. आपल्या असहायतेचा फायदा घेवून कोणी आपल्यावर बलात्कार करणार नाही आणि पडलोच त्यात आणि जर कोणता भोंदूबाबा आपल्या मानसिकतेचा शारीरिक दृष्टीकोनातून गैरफायदा घेत असतील तर त्याचं लिंगच कापून फेकण्याची ताकद आपल्यात निर्माण व्हावी.

ती करावी. एवढंच याप्रसंगी मांडणं आहे. जेणेकरुन कोणताच भोंदूबाबा आपलीच नाही तर आपल्यासारख्या कोणत्याच स्त्रीची अब्रू लुटणार नाहीत. अब्रू सुरक्षीत राहील. यात शंका नाही.

**-अंकुश शिंगाडे नागपूर**

## संक्षिप्त

### कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे सोमवारी (दि.३०) रोजगार मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिणी**/ कौशल्य विकास,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने जागेवर निवड संधी देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती बसस्टँड रोड, मालजीपुरा छत्रपती संभाजीनगर येथे सोमवार दि.३० रोजी सकाळी १० वा. रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. त्यात आय सी आय सी आय बँक, कोटक महिंद्रा बँक, ईक्युटास स्मॉल फायनांन्स बँक, नेक्सलॅड कंन्सल्टींग एल एल पी इत्यादी नियोक्तयांनी कोणतीही पदवी/ डिप्लोमा-मेकॅनिकल/इलेक्ट्रीकल/इलेक्ट्रॉनिक, आय टी आय - ऑल ट्रेड, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक उमेदवारांसाठी रोजगाराची २२८ रिक्तपदे उपलब्ध असून विविध शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या ु.ीक्षसरी. ारहीुरूरा.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या ४ प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# सिडको वाळूज ग्रोथ सेंटर: ३५ वर्षांचा वनवास संपणार; जमीन संपादनासाठी 'टीडीआर' आणि 'सर्वसमावेशक आरक्षण' पर्याय लागू







**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिणी**/
सिडको वाळूज महानगर-३ विकास योजनेतील 'ग्रोथ सेंटर'च्या मार्गातील जमिनीचा अडथळा आता दूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या ३५ वर्षांपासून रखडलेल्या जमीन संपादन प्रक्रियेला गती देण्यासाठी विभागीय आयुक्त तथा महानगर आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी टीडीआर (ढीरपीषशीरलश्रश ऊर्शींशश्रेशिपीं ठळसहीं) आणि सर्वसमावेशक आरक्षण (खपलश्रीीळींश ठशीशर्ीींरींळेप) या दोन पर्यायांची घोषणा केली आहे.

रामराई शिवारात आयोजित शेतकरी संवाद बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करत विकासाचा नवा आराखडा मांडला.

**महत्त्वाचे निर्णय आणि पर्यायांची वैशिष्ट्ये**

प्रशासनाने रोख मोबदल्याऐवजी खालील पर्यायांवर भर दिला आहे:

टीडीआर (TDR) पर्याय: शेतकऱ्यांनी रोख मोबदल्याची मागणी केली असली तरी, प्राधिकरणाची सध्याची आर्थिक स्थिती पाहता रोख रक्कम देणे शक्य नाही. त्याऐवजी जमिनीच्या बदल्यात टीडीआर दिला जाईल, जो शेतकरी बाजारात विकू शकतील किंवा इतरत्र बांधकामासाठी वापरू शकतील.

सर्वसमावेशक आरक्षण (Inclusive Reservation): या संकल्पनेमुळे शेतकऱ्यांना आपल्याच जमिनीचा विकास करण्याची संधी मिळेल. प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार, परवानगी घेऊन शेतकरी स्वतः ग्रोथ सेंटरमध्ये विकासकामे करू शकतील.

पीपीपी (PPP) मॉडेल: मुंबई महानगर प्रदेशाच्या धर्तीवर 'पास थ्रू' मॉडेलचा विचार सुरू आहे. जर खाजगी विकासक आणि शेतकरी यांची संमती असेल, तर या पर्यायासाठी शासनाची मान्यता घेतली जाईल.

**रस्ते विकासाला पहिले प्राधान्य**

ग्रोथ सेंटरमधील दळणवळण सुलभ करण्यासाठी ३० मीटर रुंदीच्या प्रमुख रस्त्यांच्या कामाला प्राधान्य देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी संमती दर्शवल्यास जमिनीची मोजणी आणि टीडीआर देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू केली जाईल. रस्ते विकासासाठी आवश्यक निधी मिळवण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही आयुक्तांनी दिले.

**अनधिकृत बांधकामांवर कडक कारवाईचा इशारा**

वाळूज परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत लेआऊट आणि बांधकामे होत असल्याबद्दल आयुक्तांनी चिंता व्यक्त केली. नागरिकांनी अनधिकृत प्लॉट्स खरेदी करू नयेत. भविष्यात अशी अनधिकृत बांधकामे निष्कासित केली जातील, असा कडक इशारा त्यांनी दिला. तक्रारीसाठी प्राधिकरणाचे अधिकृत प किंवा व्हॉट्सप क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

**बैठकीची उपस्थिती**

या महत्त्वपूर्ण बैठकीस महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, सह महानगर नियोजनकार रविंद्र जायभाये, सिडकोचे वरिष्ठ अधिकारी आणि रामराई परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ३५ वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पामुळे वाळूज परिसराच्या विकासाला आता नवी दिशा मिळण्याची चिन्हे आहेत.

## लासुर स्टेशन येथे शिवरत्न जिवाजी महाले यांचा पुर्णाकृती पुतळा स्थापन !

### शिवप्रेमी नागरिकांनी केले पुजन व दर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी** / गंगापुर तालुक्यातील महत्वाची बाजार पेठ असलेल्या लासूर स्टेशन येथे बस स्टँड लगत असलेल्या चौकात शिवरत्न जिवाजी महाले यांचा पूर्णाकृती पुतळा स्थापन करण्यात आला . दरम्यान ही घटना दि २७ मार्च सकाळी उघड झाली . यामुळे जिल्हाभरातून शिव प्रेमी नागरिकांनी दर्शन व पुजन करत भेट देत आहेत.

लासुर स्टेशन ता गंगापुर येथे बस स्थानक परिसरात असलेल्या एका चौकात वाहतुकी ला अडचण होणार नाही अशा ठिकाणी राजे छत्रपती शिवाजी




महाराजांचे स्वामी भक्त व त्यांचे प्राण वाचवणारे शिवरत्न जिवाजी महाले यांचा पुर्णाकृती पुतळा दि,२६ मार्च ते २७ मार्च च्या सुमारास अज्ञात वेळी अज्ञात शिवप्रेमी बांधवा कडून पुतळा उभारण्यात आलेल्या आहेत . ही बाब २७ मार्च रोजी सकाळी उघड झाली .ही बाब महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष दिलीप आन्ना गवळी यांना समजताच त्यांनी पुतळ्यास भेट देऊन पुजन करत दर्शन घेतले .लासुर स्टेशन तालुका गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे भव्य आणि दिव्य असा जिवाजी महालेचा पुतळा उभारण्यात आला याप्रसंगी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष दिलीप अण्णा गवळी महाराष्ट्र मंडळाचे कार्याध्यक्ष रवींद्र वाघ महाराष्ट्र मंडळाचे भावी अध्यक्ष प्रतीक भैया लिंगायत शहराध्यक्ष माऊली आवटी शहर उपाध्यक्ष प्रशांत लिंगायत गंगापूर तालुकाध्यक्ष दिनेश जी घोडके पत्रकार तुपे इत्यादी शिवप्रेमी बांधवांची उपस्थिती होती हे गाव बाजार पेठेचे असून अनेक नागरिकांची येथे वर्दळ असते .या पुतळ्या मुळे शहराच्या वैभवात भर नक्कीच पडली आहे ...

# पेट्रोलपंप चालक आणि वितरक कंपन्यांची संयुक्त बैठक तात्काळ वितरण सुरळीत करा- जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिणी**/ जिल्ह्यात येणारा पेट्रोल डिजेलचा साठा हा पूर्वी इतकाच किंबहुना थोडा जास्तच आहे. असे असतांना पेट्रोल पंपावर रांगा दिसत आहेत. मागणी व पुरवठा यात वितरक कंपन्या आणि पेट्रोलपंप चालक यांच्या दरम्यान असलेल्या तक्रारींवर तातडीने तोडगा काढून वितरण सुरळीत करा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पेट्रोलियम वितरण कंपन्या व पेट्रोलपंप चालक यांना दिले.

जिल्ह्यातील पेट्रोलपंपांवर वाहनधारकांच्या गेल्या दोन दिवसांपासून रांगा लागलेल्या दिसत आहेत. ही परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत घटकांबाबत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पेट्रोलपंप चालक आणि वितरक कंपन्यांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक बोलावली होती.

बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, लेखाधिकारी पी.पी. होळकर, सहा. पुरवठा अधिकारी संदीप शिंदे,भारत पेट्रोलियमचे शशांक तिवारी, हिंदुस्थान पेट्रोलियमचे अजयकुमार सिन्हा, इंडियन ऑईलचे गणेश खेत्री तसेच पेट्रोलपंप चालक संघटनेचे अकील अब्बास, जिशान देशमुख, गणेश दरख, राजेंद्र सलुजा, नवजिंदरसिंग आदी प्रतिनिधी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, अफवा पसरवणाऱ्यांवर पोलीस विभागामार्फत तपास करुन कारवाई होईलच. मात्र पुरेसा इंधन साठा असतांना पेट्रोलपंपावर रांगा का लागत आहेत? याबाबत वितरक कंपन्या आणि पेट्रोलपंप चालक यांनी आपापसात समन्वय साधून परिस्थिती हाताळावी व वितरण सुरळीत करावे.

जिल्हाधिकारी म्हणाले की, लोकांना आपल्याकडील साठ्याची माहिती द्या. लोकांना इंधन उपलब्ध करुन द्या. आजच जिल्हा प्रशासनाने दुचाकी वाहनांना २०० रुपयांचे पेट्रोल व चारचाकी वाहनांना २००० रुपयांचे इंधन असे जे बंधन घातले होते ते ही हटवले आहे. त्यामुळे वितरणाचा कोणताही अडथळा वा निर्बंध नाही. इंधन वितरण डेपो ते पंप या दरम्यान होणाऱ्या वाहतुकीचा कालावधी कमीत कमी करुन इंधन उपलब्ध करा. पेट्रोलपंपांवर कायदा सुव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासंदर्भात पोलिसांना सुचना देण्यात आली आहे. मात्र नागरिकांनी संयम ठेवावा. अफवांवर विश्वास ठेवू नये. नेहमीप्रमाणे पेट्रोल डिजेल आपल्या वाहनात भरा. उगाचच जादा साठा करु नका, असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.

ग्रामिण भागात विशेषतः शेतीच्या कामांना लागणाऱ्या डिजेलचीही उपलब्धता करुन देण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आल्याचेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी स्पष्ट केले.

**इंधन पुरवठा मर्यादीत करण्याचे आदेश रद्द**

पेट्रोलपंपांवरील वाहनधारकांची अचानक गर्दी वाढल्याने जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन पेट्रोल डिजेल मर्यादीत करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि, डिजेल व पेट्रोलचा पुरेसा साठा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर इंधन निर्बंधाच्या आदेशाची आवश्यकता नसल्याने आधीचे आदेश रद्द करण्यात येत असल्याचे आदेश आज पुरवठा विभागाने जारी केले.

## शेख गणी शेख महेबूब यांचे दुःखद निधन...



**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी** / गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन सावंगी येथील गणी महेबूब शेख ( उर्फ डॉन ) (वय ४७) यांचे दि.२६ मार्च गुरुवार रोजी मध्यरात्री दोन अडीच वाजेच्या सुमारास दुःखद निधन झाले त्यांचा दफनविधी लासुर स्टेशन येथील सोनापुर कब्रस्तान येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी आई भाऊ बहीण मेव्हणे भाषेसह मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात होतं दरम्यान अंत्यविधी वेळी राजकीय,शैक्षणिक,सामाजिक सह पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..

## डाक अदालत सोमवारी (दि.३०)

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिणी**/ टपाल विभागातील सेवांबद्दल असलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासंदर्भात सोमवार दि.३० रोजी डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर डाक विभागाच्या सेवांबाबत तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल अशा तक्रारींची दखल या डाक अदालत मध्ये घेतली जाते. तरी संबंधितांनी आपली डाक सेवेबाबतची तक्रार प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ यांच्या नावे दोन प्रतित पाठवावी. नंतर प्राप्त तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, असे प्रवर अधीक्षक डाकघर छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी कळविले आहे.

# महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना प्रारंभ
## क्रीडा, कलागुणांची जोपासना आवश्यक- विभागीय आयुक्त पापळकर

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिणी**/ कामकाजातील तणाव घालविण्यासाठी क्रीडा व कलागुणांची जोपासना करणे आवश्यक आहे. त्यासाठी महसूल विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्पर्धांमधील आपला सहभाग वाढवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना केले.








विभागीय क्रीडा संकूल येथे आज महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना सुरुवात झाली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, अपर आयुक्त रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य) संगिता राठोड, संगिता सानप, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, संतोष गोरड, अरुण जऱ्हाड, नीलम बाफना तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, तहसिलदार व कर्मचारी तसेच कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, आपल्या दैनंदिन जगण्यात खिलाडुवृत्तीने जगायचे असते, त्या खिलाडुवृत्तीची जोपासना अशा स्पर्धांमुळे होते. त्यामुळे वातावरण सकारात्मक होऊन निकोप स्पर्धा निर्माण होते. क्रीडा व सांस्कृतिक गुणांची जोपासना ही आयुष्यात आवश्यक असते,असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त पापळकर म्हणाले की, आपल्यातला गुणांचा विकास करण्यासाठी खेळा. छत्रपती संभाजीनगर विभागाला राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळायला हवे या जिद्दीने खेळा. उत्कृष्ट सादरीकरणाचा ध्यास घ्या. तणावमुक्त जीवन जगायचे असेल तर क्रीडांगणावर सराव करुन , खेळून घाम गाळावा लागतो असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले.

या स्पर्धांमधील विजेते खेळाडू व संघ हे विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी पाठविले जातील. विभागीय क्रीडा स्पर्धा ह्या परभणि येथे दि.३ ते ५ एप्रिल दरम्यान होणार आहेत.

# पुरषोत्तम श्री.प्रभू श्रीराम जल्मोत्सव कन्नड नगरीत झाला भक्तिमय वातावरणात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी** - कन्नड शहरात दरवर्षी प्रमाणे यंदाही सार्वजनिक श्रीराम नवमी जन्मोत्सव मोठ्या भक्तीभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील मुख्य असलेल्या गिरणी मैदान येथून सायंकाळी ५ वा.भव्य मिरवणुकीला प्रारंभ करण्यातआला.सदर भव्य मिरवणूक ही शहरातील मुख्य असलेल्या हिवरखेडा नाका, ते पिशोर नाका या मार्गाने पार पडली.मार्गभर या मिरवणूकीतील श्री.प्रभू जय श्रीरामाच्या जय घोषणांनी* संपूर्ण परिसर *दुमदुमून गेला होता. या मिरवणूकी दरम्यान पिशोर नाका येथे सार्वजनिक जणसमुदायाने एकत्र येत हनुमान चालीसाचे एकत्रित पठणही केले, ज्यामुळे वातावरण अधिक भक्तिमय झाले होते. त्यानंतर *श्रीराम मंदिर येथे प्रभू श्रीरामांची सामुदायिक आरती करून मिरवणुकीची भक्तिपूर्ण सांगता करण्यात आली.या पवित्र कार्यक्रमाला भाजपा नेते युवा उद्योजक श्री. मनोज भाऊ पवार, यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थापकअध्यक्ष श्री.नितीन भाऊ राठोड,समितीचे अध्यक्ष ईश्वर भाऊ पाटील उपाध्यक्ष श्री. विनोद गजलेश्वर श्री. कैलास भाऊ जाधव, श्री अनिल भाऊ खंबाट, श्री अमोल भाऊ तागवाले,योगराज साबळे, भाजपा युवामोर्चा तालुका अध्यक्ष श्री पवनभाऊ ठाकूर,श्री.शंकर राऊत,संजय पंडित ,उमेश राठोड. रमेश शिंदे, बंटी इंगळे,अपूर्वाअनिल शिरसाठ, आदित्य पाटील,जयेश देशमुख,विशाल जाधव,

श्री प्रमोद ढोले सर, श्री सचिन जाधव, श्री वाणी साहेब, श्री कुलकर्णी साहेब,श्री मयूर राठोड, श्री देशपांडे सर,श्री. कालिदास देशपांडे, श्री दीपक डोळस,कृष्णा बडकभैय्या, डॉ.संजय तेली,श्री.विठ्ठल सिंग परदेशीयांनी परिश्रमपूर्वक सुंदर नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे आयोजक :- स्वराज्य रक्षक संघ, कन्नड शहर*

मर्यादा, सत्य आणि धर्म* यांचे *प्रतीक असलेल्या पुरुषोत्तम श्री.प्रभू श्रीरामांच्या जन्मोत्सवाच्या पावन दिवशी,सर्वांचे जीवनात सुख,शांती आणि समृद्धी नांदो हीच सर्वानुमते श्री.प्रभू श्रीरामचरणी प्रार्थना केली.





# संक्षिप्त

## रोजगार मेळाव्यात ११० तरुणांना मिळाली नोकरी; धूत ट्रान्समिशनकडून २७ जणांना जागीच नियुक्तीपत्रे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जिल्ह्यातील बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून देत, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांनी ११० उमेदवारांची निवड केली असून, त्यांच्या करिअरला नवी दिशा मिळाली आहे. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण ठरले ते छत्रपती संभाजीनगर येथील धूत ट्रान्समिशन प्रा. लि. हे औद्योगिक गृह. या कंपनीने २७ पात्र उमेदवारांना निवडीनंतर तात्काळ नियुक्तीपत्रे देऊन त्यांच्या उत्साहात भर घातली. शुक्रवार दि.२७ मार्च रोजी शासकीय आयटीआय जालना येथे हा मेळावा पार पडला. सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी शासकीय आयटीआयच्या प्राचार्या श्रीमती तृप्ती भोपे आणि उपप्राचार्या श्रीमती रजनी शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यात इयत्ता पाचवी ते दहावी, बारावी आणि आयटीआय (सर्व ट्रेड्स) उत्तीर्ण असलेल्या शेकडो उमेदवारांनी हजेरी लावली होती. मेळाव्यात एकूण ९ नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये असिस्टंट मॅनेजर, ब्रांच मॅनेजर, कॅशियर, टेक्निशियन, ऑपरेटर, फील्ड एक्झिक्युटिव्ह, हेल्पर आणि ए.सी.सी. मशीन ऑपरेटर अशा विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. एकूण ११० उमेदवारांना या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल परिहार यांनी केले, तर आभार प्रदर्शन एस. जी. चव्हाण यांनी केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी आयटीआयचे गटनिदेशक एस. एस. कापसे, ए. एस. धाबे, बी. डी. वाणी यांच्यासह कौशल्य विकास विभागातील भुजंग रिठे, अमोल बोरकर, आत्माराम दळवी, प्रदीप डोळे, योगेश बहुरे, नितीन लोकडे, कैलास काळे, रवींद्र पाड्मुख, विशाल जगरवाल, दीपक पालवे आणि गणेश सुपारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. असेही कळविले आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जिल्ह्यात दि.३१ मार्च रोजी भगवान महावीर जयंती, २ एप्रिलला हनुमान जन्मोत्सव, ३ एप्रिल रोजी गुड फ्रायडे तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी आणि ५ एप्रिल रोजी इस्टर संडे या सण, उत्सव आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश ६ एप्रिल २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही.

व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पाबाबत अफवांवर विश्वास ठेवू नका; मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा खुलासा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी /(गणेश सपकाळ)/** जालना जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प नुकताच सादर झाला असून, त्यातील काही तरतुदींवरून सध्या जिल्ह्यात उलट-सुलट चर्चा सुरू आहे. विशेषतः 'शिक्षण आणि आरोग्याचे खासगीकरण होणार' अशा प्रकारची चुकीची माहिती पसरवली जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हा परिषद प्रशासनाने अधिकृत खुलासा जारी करून नागरिकांमधील संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**नेमका वाद काय?**

गेल्या काही दिवसांपासून प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पावर टीका केली जात होती. शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या बाबतीत प्रशासनाने घेतलेले निर्णय हे खासगीकरणाला पूरक असल्याचा दावा काही घटकांकडून करण्यात आला. विशेषतः शाळा भाड्याने देण्याच्या प्रस्तावामुळे 'शासकीय शिक्षण व्यवस्था धोक्यात येईल' असा सूर उमटत होता.

**प्रशासनाचा दावा: 'हे खासगीकरण नव्हे, तर सक्षमीकरण'**

या सर्व टीकेला उत्तर देताना मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी स्पष्ट केले की, अर्थसंकल्पाचा चुकीचा अर्थ काढला जात आहे. प्रशासनाने मांडलेल्या भूमिकेतील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:

संसाधनांचा वापर: काही शाळा भाडेतत्त्वावर देण्याचा विचार हा केवळ स्थानिक स्तरावरील उपलब्ध संसाधनांचा (उदा. रिकाम्या खोल्या किंवा जागा) अधिक प्रभावी वापर करण्यासाठी आहे.

गुणवत्ता सुधार: अर्थसंकल्पातील मुख्य तरतुदी या शाळांची गुणवत्ता सुधारणे, विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा देणे आणि मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती करणे यासाठी आहेत.

पारदर्शकता: सर्व तरतुदी या कायदेशीर चौकटीत राहून आणि सरकारी नियमांनुसारच करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक हिताला बाधा येईल असा कोणताही निर्णय घेतलेला नाही.

अपूर्ण माहितीच्या आधारे निष्कर्ष काढून संभ्रम पसरवणे चुकीचे आहे. टीकाकारांनी संपूर्ण अर्थसंकल्पाचा सखोल अभ्यास करावा किंवा अधिक माहितीसाठी थेट जिल्हा परिषद प्रशासनाशी संपर्क साधावा.

**- मिन्नू पी. एम., मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना**




**नागरिकांना आवाहन**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे 'खासगीकरण' होत असल्याच्या अफवांना बळी न पडता वस्तुस्थिती समजून घेण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## जालना जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल पुरवठा सुरळीत; विक्रीवरील मर्यादा रद्द - जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करत जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (पुरवठा विभाग) यांनी इंधन विक्रीवरील पूर्वीचे निर्बंध रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी २७ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, सोशल मिडियावर पसरलेल्या अफवांमुळे पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होत होती. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये काही काळ समस्या निर्माण झाली होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन २५ मार्च, २०२६ रोजी पेट्रोल व डिझेल विक्रीवर काही मर्यादा घालण्यात आल्या होत्या. मात्र, सद्यस्थितीत जिल्ह्यातील इझउङ, खजउङ, क्ष्झउङ तसेच इतर कंपन्यांकडून पुरेसा इंधन साठा उपलब्ध झाल्याने आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली आहे. त्यामुळे इंधन वितरणावर निर्बंध ठेवण्याची गरज उरलेली नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. यामुळे २५ मार्च रोजी जारी करण्यात आलेला पेट्रोल-डिझेल विक्रीवरील मर्यादेचा आदेश तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यक तेवढेच इंधन घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. दरम्यान, या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पोलिस विभाग, तहसीलदार, तेल कंपन्यांचे अधिकारी तसेच पेट्रोल पंप चालकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

## शनिवारी जिल्ह्यातील चार मंडळात समाधान शिबिराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जिल्ह्यातील नागरिकांच्या महसुली तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी आणि विविध शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियान (टप्पा क्र. १) राबविण्यात येत आहे. मार्च ते मे २०२६ या कालावधीत तालुक्यातील विविध मंडळामध्ये या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून याद्वारे प्रशासकीय सेवा थेट जनतेच्या दारात पोहोचवण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहितेअंतर्गत प्रलंबित नोंदी अद्ययावत करणे, डिजिटल सेवा पोर्टलवरील प्रकरणांचा निपटारा करणे आणि 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' अंतर्गत तातडीने दाखले व सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महसुली अडचणींमुळे अडकलेली सर्वसामान्यांची कामे या शिबिरांच्या माध्यमातून मार्गी लागणार असल्याने ग्रामीण भागातील जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.

कार्यक्रमानुसार, शनिवार दि. २८ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्ह्यातील चार महत्त्वाच्या मंडळामध्ये ही शिबिरे पार पडणार आहेत. यामध्ये जालना तालुक्यातील विरेगाव मंडळातील साळेगव्हाण महादेव मंदिर, बदनापूर तालुक्यातील सेलगाव मंडळात जि.प. शाळा सेलगाव, अंबड तालुक्यातील वडीगोद्री मंडळातील श्री. गुरुदेव विद्यामंदिर वडीगोद्री आणि भोकरदन तालुक्यातील हसनाबाद मंडळातील मारोती मंदिर हसनाबाद या ठिकाणांचा समावेश आहे. नागरिकांनी आपल्या कामांशी संबंधित आवश्यक कागदपत्रासह या शिबिरांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

# राजसाहेबांचा मोठा निर्णय: माजी आमदार डॉ. जयप्रकाश बाविस्कर यांची जालना जिल्हा संपर्क अध्यक्षपदी नियुक्ती

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी /(गणेश सपकाळ)/** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी मनसे अध्यक्ष मा. श्री. राजसाहेब ठाकरे यांनी पक्षात मोठे फेरबदल केले आहेत. यानुसार, पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार ड. जयप्रकाश बाविस्कर यांची जालना जिल्हा संपर्क अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीमुळे जालना जिल्ह्यातील मनसे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

**राजसाहेबांचे विश्वासू आणि अनुभवी नेतृत्व**

ड. जयप्रकाश बाविस्कर हे राजसाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू आणि निष्ठावान सहकारी म्हणून ओळखले जातात. मनसेच्या स्थापनेपासून ते पक्षात सक्रिय असून, विविध आंदोलने आणि संघटनात्मक बांधणीत त्यांनी आजवर मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्याकडे असलेल्या प्रदीर्घ राजकीय आणि प्रशासकीय अनुभवाचा फायदा जालना जिल्ह्यात पक्ष वाढवण्यासाठी होणार आहे.

**कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण**

बाविस्कर यांच्या नियुक्तीची बातमी समजताच जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. जालना जिल्ह्यासह जाफ्राबाद आणि घनसावंगी यांसारख्या तालुक्यांमध्ये मनसेला आता नवी उभारी मिळणार असल्याची भावना पदाधिकारी व्यक्त करत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती मनसेसाठी 'मास्टरस्ट्रोक' मानली जात आहे.

**प्रमुख वैशिष्ट्ये:**

अनुभवी संघटक: माजी आमदार असल्याने प्रशासकीय कामावर मोठी पकड.

निष्ठावान नेतृत्व: पक्षाच्या पडत्या काळातही राजसाहेबांसोबत खंबीरपणे उभे राहणारे नेते.

जिल्हाव्यापी संपर्क: ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधण्याचे कसब.

**विविध पदाधिकाऱ्यांकडून स्वागत**

या निवडीचे स्वागत घनसावंगी तालुका अध्यक्ष गोवर्धन ढेरे, जाफ्राबाद तालुका सरचिटणीस पंढरीनाथ पाटील म्हस्के यांच्यासह जिल्ह्यातील अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी केले आहे. बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याच्या प्रत्येक गावात आणि तालुक्यात मनसेचे जाळे अधिक विस्तारले जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



## जालन्यात 'लिव्ह अँड लायसन्स' ऑनलाइन नोंदणी बनली डोकेदुखी; लाचेसाठी अधिकारी अडकवतायत फाईल्स!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / शासनाने नागरिकांच्या सुविधेसाठी आणि पारदर्शकतेसाठी सुरू केलेली 'ऑनलाइन लिव्ह अँड लायसन्स' (भाडेकरार) नोंदणी प्रक्रिया जालन्यात मात्र भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडली आहे. सर्व कागदपत्रे कायदेशीर आणि ऑनलाइन असूनही, दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी अर्थपूर्ण तडजोड केल्याशिवाय फाईल्स मंजूर करत नसल्याच्या गंभीर तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. यामुळे डिजिटल इंडियाच्या संकल्पनेलाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र दिसत आहे.

**काय आहे नेमका प्रकार?**

मिळालेल्या माहितीनुसार, भाडेकरार नोंदणीसाठी नागरिकांना आता कार्यालयात हेलपाटे मारण्याची गरज नसावी, म्हणून ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. मात्र, जालन्यात याउलट परिस्थिती आहे.

प्रलंबित अर्ज: ऑनलाइन अर्ज सादर केल्यानंतर अनेक आठवडे तो प्रलंबित ठेवला जातो.

क्षुल्लक त्रुटी: जाणीवपूर्वक अर्जात तांत्रिक चुका किंवा कागदपत्रांच्या किरकोळ त्रुटी काढून अर्ज फेटाळले जातात.

प्रत्यक्ष भेटीचा आग्रह: नागरिक जेव्हा कार्यालयात चौकशीसाठी जातात, तेव्हा त्यांना थेट किंवा अप्रत्यक्षपणे पैशांची (लाचेची) मागणी केली जाते. जोपर्यंत चिरीमिरी दिली जात नाही, तोपर्यंत डिजिटल स्वाक्षरीने अर्ज मंजूर केला जात नाही.

**डॉ. महेश धन्नावत यांची आक्रमक भूमिका**

या समस्येवर कायदेशीर बाजू मांडताना ड. महेश धन्नावत यांनी संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, जर ऑनलाइन सेवा देऊनही नागरिकांना कार्यालयात जाऊन पैसे द्यावे लागत असतील, तर त्या प्रणालीचा उपयोग काय? सरकारने एकतर अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी किंवा त्यांच्यासाठी अधिकृत 'कमिशन' निश्चित करावे, जेणेकरून सर्वसामान्यांची ही छुप्या मार्गाने होणारी आर्थिक पिळवणूक तरी थांबेल.

ग्राहक परिषद आक्रमक, जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेणार

या गैरप्रकाराची गंभीर दखल अखिल भारतीय ग्राहक परिषदेने घेतली आहे. अनेक त्रस्त नागरिकांनी परिषदेकडे आपल्या तक्रारी नोंदवल्या आहेत. एका तक्रारदाराने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, सर्व कागदपत्रे बरोबर असूनही माझा अर्ज तीन आठवड्यांपासून पडून आहे. कार्यालयात गेल्यावर केवळ 'साहेब नाहीत' किंवा 'नंतर या' अशी उत्तरे मिळतात, मात्र खासगी एजंटमार्फत गेल्यास काम लगेच होते.

अखिल भारतीय ग्राहक परिषद आता या प्रकरणातील सर्व पुरावे गोळा करून जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करणार आहे. दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी परिषदेने केली आहे.

**महत्त्वाचे मुद्दे:**

डिजिटल अडथळा: मानवी हस्तक्षेप कमी करण्यासाठी आणलेली यंत्रणा मानवी भ्रष्टवृत्तीमुळे ठप्प.

वेळेचा अपव्यय: घरबसल्या काम होण्याऐवजी नागरिकांना आठवडे वाट पाहावी लागत आहे.

विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह: अशा प्रकारांमुळे नागरिकांचा शासकीय ऑनलाइन प्रणालीवरील विश्वास उडत चालला आहे.

## आदेश असूनही रस्ता बंदच!-घुंगर्डे हादगाव शेतकऱ्यांचा संताप टोकाला;उपोषणाचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी /(गणेश सपकाळ)/** अंबड तालुक्यातील मौजे घुंगर्डे हादगाव येथील रुई-घुंगर्डे हादगाव शेत पांदण रस्ता सुरू करण्याच्या मागणीवरून शेतकऱ्यांचा संताप आता उफाळून आला असून,आदेश देऊनही अंमलबजावणी होत नसेल,तर प्रशासनाची भूमिका संशयास्पद आहे का ?असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.आज शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय अंबड,उपविभागीय अधिकारी कार्यालय अंबड तसेच जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे उपोषणासंदर्भात निवेदन सादर करून प्रशासनाला अंतिम इशारा दिला. सदर रस्ता हा सरकारी नकाशावर नोंद असलेला अधिकृत शेत पांदण रस्ता असूनही काही व्यक्तींनी तो बेकायदेशीररित्या अडवून ठेवला असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.विशेष म्हणजे,या प्रकरणी मा.तहसीलदार अंबड यांनी दि.२६ फेब्रुवारी २०२६ रोजी शेतकऱ्यांच्या बाजूने स्पष्ट व अंतिम आदेश दिला आहे.मात्र,त्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. आदेशानंतरही संबंधितांकडून वारंवार अपील दाखल करून मुद्दाम विलंब करुन शेतकऱ्यांना वेठीस धरले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.या प्रकरणाकडे केवळ स्थानिक वाद म्हणून न पाहता हा थेट संविधानिक हक्कांचा भंग असल्याचे शेतकऱ्यांनी ठामपणे मांडले आहे.भारतीय संविधानातील कलम १४ नुसार समानतेचा हक्क,कलम १९(१)(व) नुसार मुक्त हालचालीचा हक्क आणि कलम २१ नुसार जीवन व उपजीविकेचा हक्क या तिन्ही अधिकारांवर या घटनेमुळे गदा येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.हा केवळ रस्ता नाही,तर आमच्या शेतीचा जीवनमार्ग आहे,अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. तहसीलदारांचा आदेश असूनही त्याची अंमलबजावणी न करणे हे भारतीय दंड संहितेतील कलम १६६ अंतर्गत कर्तव्यच्युती ठरू शकते,तर सरकारी आदेशाला जाणीवपूर्वक विरोध करणे हे कलम १८८ अंतर्गत दंडनीय गुन्हा असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.त्यामुळे प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास कायदेशीर पातळीवर लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान,रस्ता बंद असल्यामुळे सुमारे २०० शेतकरी कुटुंबांवर मोठा आर्थिक व मानसिक परिणाम होत असून,उन्हाळ्यातील महत्त्वाची शेतीकामे ठप्प झाली आहेत.या पार्श्वभूमीवर आता नाही तर कधीच नाही असा इशारा देत, दि. ८ एप्रिल २०२६ पासून मौजे घुंगर्डे हादगाव येथील गट क्र.९९ व १०० च्या बांधावर बेमुदत शांततामय उपोषण आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून आदेशाची अंमलबजावणी करावी,अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील,असा स्पष्ट व थेट इशारा देत शेतकऱ्यांनी संघर्षाची भूमिका अधिक तीव्र केली आहे.या आंदोलनात घुंगर्डे हादगाव-रुई पांदण रस्त्यावरील सर्व संबंधित शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




## 'अमृत पेठ-२०२६' उद्योजक मेळाव्याचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / स्थानिक कारागिरांच्या कौशल्याला दाद देण्यासाठी आणि स्वदेशी उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृतकडून जालन्यात 'अमृत पेठ २०२६' या भव्य उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ११ आणि १२ एप्रिल २०२६ रोजी महेश भवन, गुरु बच्चन चौक, मंठा चौफुली, जालना येथे थेट उत्पादकांकडून दर्जेदार वस्तू खरेदी करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. स्वदेशी वस्तूंच्या वापराला चालना देणे हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेने हे पाऊल उचलले आहे. या मेळाव्यात स्थानिक उद्योजक, महिला बचत गट तसेच नवउद्योजकांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांचे स्टॉल थाटले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने घरगुती उत्पादने, आकर्षक हस्तकला वस्तू, खमंग खाद्यपदार्थ, तयार कपडे आणि दैनंदिन वापराच्या वैविध्यपूर्ण वस्तूंचा समावेश असेल. स्वदेशी बाजारपेठ या संकल्पनेवर आधारित हा मेळावा सर्वांसाठी खुला असून, जालनाकरांनी आपल्या कुटुंबीय आणि मित्रपरिवारासह या उपक्रमाला भेट द्यावी. स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देऊन स्वदेशीचा संकल्प अधिक दृढ करावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी ७३९१०६५४७४ किंवा ९४२१९४४७५२ या क्रमांकावर संपर्क साधावा. असे जिल्हा व्यवस्थापक, अमृत कार्यालय, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## बेवारस वाहनांच्या मुळ मालकांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिणी/** सिडको पोलीस स्टेशन येथे ७५ बेवारस वाहने पडून आहेत. या वाहनांची बेवारस म्हणून नोंद करण्यात आली आहे. या वाहनांची निर्गत करावयाची असल्याने मुळ मालकांनी सिडको पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा,असे आवाहन सिडको पोलीस स्टेशनचे निरीक्षक अतुल येरमे यांनी केले आहे. वाहनांची माहिती सिडको पोलीस स्टेशन येथे पहावयास मिळेल,असेही कळविण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813